आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र– दुपारी ३  वाजता

२६ नोव्हेंबर २०२२ – शनिवार

**ठळक बातम्या**

- २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या १४ व्या स्मृतिदिनी देशाची शहिदांना आदरांजली

- देशभरात संविधान दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

- गोवर आजाराच्या साथीचा  वाढता  प्रादुर्भाव पाहता लसीकरण न झालेल्या बालकांच्या लसीकरणाची मोहीम अधिक तीव्र करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- **आणि**

- ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचं निधन

**<><><><><>**

देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला हादरवून टाकणाऱ्या मुंबईवरच्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याला आज १४ वर्ष पूर्ण होत आहेत. या हल्ल्यात जीवाची पर्वा न करता दहशतवाद्यांना सामोरे गेलेले आणि प्राण गमावलेले पोलीस, सुरक्षा रक्षक आणि निरपराध नागरिकांना आदरांजली वाहण्यासाठी आज विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ....

*राज्यपाल भगतसिंग कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत पोलीस आयुक्तालयातल्या शहीद पोलिसांच्या स्मारकाला भेट देऊन पुष्पचक्र अर्पण केलं. कार्यक्रमात पोलीस बँड पथकाने ‘सलामी शस्त्र’ आणि 'बिगुलर लास्ट पोस्ट'  ही भावपूर्ण धून वाजवून  हुतात्म्यांना सलामी दिली. त्यानंतर राज्यपालांनी तेथे उपस्थित हुतात्मा पोलीस कुटुंबातील सदस्यांची भेट घेतली.२६/११ हा देशाच्या इतिहासातला  काळा दिवस असून मुंबईवर झालेल्या*

*दहशतवादी हल्ल्यात प्राणांची पर्वा न करता अनेक निष्पाप नागरिकांचे जीव वाचवताना बलिदान दिलेले सर्व वीर शहीद पोलीस, जवान तसंच मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना भावपूर्ण श्रध्दांजली, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. दहशतवाद्यांशी सामना करताना जखमी झालेल्या पोलिसांच्या सन्मानार्थ मुंबईत गेटवे ऑफ इंडिया इथं आयोजित केलेल्या कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. गेटवे ऑफ इंडियाच्या अगदी जवळ असलेलं, प्रतिष्ठित ताज हॉटेल हे दहशतवाद्यांनी लक्ष्य केलेल्या ठिकाणांपैकी एक होतं. राज्यातही आज विविध ठिकाणी कार्यक्रम होत असून पाकिस्तानी दहशतवाद्यांशी शौर्यानं मुकाबला करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासाठी सांगलीपासून मुंबईतल्या गिरगाव चौपाटीवरच्या शहीद तुकाराम ओंबळे स्मारकापर्यंत दौड आयोजित करण्यात आली होती.*

**<><><><><>**

मुंबईतल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांचं देश कृतज्ञतेनं स्मरण करत आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. आपलं कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सुरक्षा रक्षकांना देश आदरांजली वाहत आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनीही २६/११ च्या हल्ल्यात जीव गमावलेल्यांना आदरांजली वाहिली आहे. देशाला २६/११ च्या हल्ल्याचं विस्मरण झालेलं नाही, आणि ते कधीही विस्मृतीत जाणार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे.

या हल्ल्यात शहीद झालेले पोलीस, सुरक्षा दलाचे अधिकारी आणि नागरिकांना माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग सिंग ठाकूर यांनी आदरांजली वाहिली आहे. राष्ट्र नेहमीच या शूरवीरांच्या त्याग आणि बलिदानाचं स्मरण करेल, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र– दुपारी ३ वाजता

२६ नोव्हेंबर २०२२ – शनिवार

<><><><><>

देशाची आर्थिक राजधानी आणि देशाच्या सार्वभौमत्वावर झालेला २६/११ चा हल्ला हा कधीही भरून न येणारा घाव आहे; मात्र असं दुःसाहस करणाऱ्यांना सर्वशक्तीनिशी नेस्तनाबूत केलं जाईल हे देशानं कृतीतून दाखवून दिलं आहे, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबईत हॉटेल ताजमहल पॅलेस इथं आयोजित '२६/११ मुंबई संकल्प' या कार्यक्रमात ते काल बोलत होते. मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचं काम आपल्या शासनकाळात वेगानं पूर्ण करण्यात आलं. याचाच दुसरा टप्पा देखील सुरू करण्यात येत असून तो अधिक प्रगत आणि प्रभावशाली असेल, असं ते म्हणाले.

<><><><><>

दहशतवादामुळे मानवतेला धोका असल्याचं मत परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज व्यक्त केलं आहे . मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचं स्मरण करून डॉ. जयशंकर म्हणाले की, भारतासह संपूर्ण जग आज २६/११ च्या पीडितांना स्मरण करत आहे. भारत नेहमीच जागतिक शांतता आणि सामाजिक सौहार्दाचा आश्रयदाता राहिला आहे, परंतु दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी हा देश कटिबद्ध आहे असं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले, त्यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यात लोकांचे रक्षण करताना ज्यांनी सर्वोच्च बलिदान दिले त्यांना त्यांनी आदरांजली वाहिली.

<><><><><>

संविधान दिन आज सर्वत्र साजरा होत आहे. भारतीय राज्यघटनेतल्या मूल्यांचं संवर्धन करण्याचा संकल्प आजच्या संविधान दिनी करावा असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. संविधान म्हणजे केवळ वकिली दस्तऐवज नसून ते कालसुसंगत जगण्याचं साधन आहे आणि काळाची गरज हाच

त्याचा आत्मा आहे असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत याचा उल्लेख धनखड यांनी केला आहे.

**<><><><><>**

संविधान दिन आज विविध कार्यक्रमांनी साजरा होत आहे. भारतीय राज्यघटना खुली, भविष्यवादी आणि पुरोगामी विचारांसाठी प्रसिध्द आहे. तिचा आत्मा युवाकेंद्रित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. ते आज संविधान दिनानिमित्त नवी दिल्ली इथं सर्वोच्च न्यायालयात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. राज्यघटना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी तरुणांनी चर्चा आणि वादविवादांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन मोदी यांनी केलं. देशातील सर्वांसाठी न्यायसुलभता सुनिश्चित करण्यासाठी न्यायपालिका ई-इनिशिएटिव्हसह अनेक पावलं उचलत असल्याचे मोदी यांनी अधोरेखित केलं.
मोदी पुढे म्हणाले की, आजच्या जागतिक परिस्थितीत संपूर्ण जगाच्या नजरा भारतावर आहेत आणि वेगाने होत असलेल्या विकासादरम्यान देशाची जागतिक प्रतिमा मजबूत होत आहे. भारत एका आठवड्याच्या कालावधीत G२० चं अध्यक्षपद स्वीकारेल आणि लोकशाहीची जननी म्हणून देशाची प्रतिमा मजबूत होईल याची खात्री करणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. या प्रसंगी त्यांनी मुंबई दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. कार्यक्रमादरम्यान, प्रधानमंत्र्यांनी ई-कोर्ट प्रकल्पांतर्गत विविध नवीन उपक्रमांचं उद्घाटन केलं. हा प्रकल्प याचिकाकर्ते, वकील आणि न्यायपालिका यांना माहिती आणि तंत्रज्ञानाद्वारे सेवा प्रदान करण्याचा प्रयत्न आहे, असं त्यांनी सांगितलं. संविधान दिनानिमित्त आज राज्यभर अनेक ठिकाणी कार्यक्रम आयोजित केले होते. **सोलापुरा**त पार्क चौक इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून आणि संविधान उद्देशिकेचं वाचन केल्यावर करून फेरीची

सुरवात करण्यात आली. सामाजिक न्याय विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून दिला पाहिजे असं शंभरकर यांनी सांगितलं. कोणीही यापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं. समाजातल्या शेवटच्या घटकांपर्यंत सामाजिक न्याय विभागाच्या योजना पोहोचवल्या गेल्या पाहिजेत, असं ते यावेळी म्हणाले. **औरंगाबाद** महानगरपालिकेत भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आलं आणि संविधान उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. परभणी शहरात राजगोपालचारी उद्यानातून संविधान रॅली काढण्यात आली. यावेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचं सामुहिक वाचन करण्यात आलं.

<><><><><>

मुंबईसह राज्याच्या काही भागात गोवर आजाराच्या साथीचा वाढता प्रादुर्भाव पाहता लसीकरण न झालेल्या बालकांच्या लसीकरणाची मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. ज्या बालकांचं गोवर प्रतिबंधक लसीकरण झालेलं नाही त्यांना लगेच संक्रमण होण्याचा धोका वाढतो, असं राज्याचे दक्षता अधिकारी डॉ. प्रदीप आवटे यांनी सांगितलं. गोवर आजाराचा प्रादुर्भाव हा कोविड - १९ पेक्षा अधिक वेगानं होतो आहे. गोवर आजाराने संक्रमित झालेल्या एका व्यक्तीमुळे १२ ते १५ जणांना संसर्ग होण्याची शक्यता असते, लसीकरण झालेल्या बालकांना गोवराचा संसर्ग झाला तरी त्याची तीव्रता कमी असते, असं त्यांनी सांगितलं. दरम्यान, मुंबईत काल गोवरचे आठ नवीन रुग्ण आढळून आले. त्यामुळे मुंबईतल्या एकूण गोवर रुग्णांची संख्या २६० वर पोहोचली आहे. केवळ मुंबईत गोवरामुळे सुमारे १३ बालकांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागानं दिली आहे. मुंबईत कुर्ला आणि गोवंडी, ठाणे जिल्ह्यात भिवंडी आणि नाशिक जिल्ह्यात मालेगाव मध्ये गोवरचा प्रादुर्भाव वाढल्याची नोंद आहे.

**<><><><>**

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आज श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून PSLV C-५४ या अंतराळ यानाचं यशस्वी प्रक्षेपण केलं. या अंतराळ यानाच्या पेलोडमध्ये एक महासागर निरीक्षण उपग्रह आणि आठ सूक्ष्म उपग्रह असून ते दोन तासांच्या निर्धारित वेळेत सूर्याच्या कक्षेत स्थापित केले जाणार आहेत. अंतराळ यानाच्या ११७ किलो वजनी पेलोडमध्ये ओशन मॉनिटर, सी सरफेस मॉनिटर, के.यू. बँड, स्कॅबट्रोमीटर आणि फ्रान्सचा पेलोड अर्गोस यांचा समावेश आहे.

**<><><><>**

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत चालू आर्थिक वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्याने नोव्हेंबर महिन्यातच उद्दिष्टाच्या १०७ पूर्णांक ९ दशांश टक्के कर्ज निधी वितरण करून राज्यात आघाडी मिळवली आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्याला २ हजार ९०० बचत गट समूहांना ६५ कोटी एवढं कर्ज वितरित करण्याच उद्दिष्ट दिलं होत. जिल्ह्यात आता पर्यंत २ हजार ४४२ बचतगटांना ६९ कोटी ६५ लाख ९३ हजार रुपये एवढं कर्ज वितरण करण्यात आलं आहे. आर्थिक वर्ष संपायला अजून चार महिन्यांपेक्षा जास्त कालावधी शिल्लक असताना जिल्ह्यानं एवढी मजल मारल्याने जिल्ह्यातल्या महिलांना समूहाच्या माध्यमातून व्यवसाय करायला प्रोत्साहन मिळालं आहे. जिल्ह्यात समूहासाठी अनेक प्रस्ताव येत असून समूह उद्दिष्ट सुद्धा लवकरच १०० टक्के पूर्ण होईल असा विश्वास जिल्हा अभियान व्यवस्थापक वैभव पवार यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><>**

उस्मानाबाद जिल्ह्यात २०२१ मधल्या खरीप हंगामात सोयाबीन पिकाच्या नुकसानीपोटी, प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत बजाज अलायन्स इन्शुरन्स

कंपनीनं शेतकर्यांना कमी नुकसान भरपाई दिल्याबद्दल, सिटी बँकेनं या कंपनीची सर्व खाती गोठवली आहेत. उस्मानाबादचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी ही माहिती दिली. जिल्ह्यातल्या ३ लाख ६५ हजार शेतकऱ्यांना पिक विमा योजनेतल्या पिकांची संरक्षित रक्कम म्हणून ७४८ कोटी रुपये मिळणं अपेक्षित असताना, या कंपनीने फक्त ३७४ कोटी ३४ लाख इतकी रक्कम अदा केली. उर्वरित रक्कम प्राप्त होणं बाकी असल्यानं जिल्हाधिकार्यांनी जिल्हा तक्रार निवारण समितीच्या बैठकीत या कंपनीला पंधरा दिवसात नुकसान भरपाई देण्याचे आदेश देऊनही, अद्यापपर्यंत रक्कम जमा केली नाही. त्यामुळे या कंपनीची सिटी बँकेतली सर्व खाती गोठवण्यात यावी, तसंच ३७४ कोटी रुपये जिल्हाधिकाऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

**<><><><><>**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदवीधर गटाच्या अधिसभा निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. या निवडणुकीत १० जागांसाठी एकूण ५३ उमेदवार रिंगणात असून औरंगाबाद, जालना, बीड आणि उस्मानाबाद या चार जिल्ह्यात ८३ मतदान केंद्रांवर संध्याकाळी पाच वाजेपर्यंत मतदान चालणार आहे.

**<><><><><>**

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे नायगाव बीडीडी चाळीतल्या ४४२ पात्र गाळेधारकांना पुनर्विकासाअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्विकास इमारतीमध्ये सदनिकांचा क्रमांक निश्चितीचा कार्यक्रम येत्या सोमवारी संगणकीय प्रणालीद्वारे होणार आहे.

**<><><><><>**

गोव्यात सुरू असलेल्या **इफ्फी** अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात झालेल्या पाच दिवसीय फिल्म बाजारचा समारोप आज प्रसाद डी-१

पुरस्कारप्राप्त बांगलादेशी चित्रपट ‘आगंतूक’ च्या प्रदर्शनानं झाला. बिप्लब सरकार यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. इफ्फीचे संचालक रवींद्र भाकर यांनी सांगितलं की, सुमारे चौदाशे नोंदणीकृत प्रतिनिधींचा समावेश असलेल्या फिल्म बाजारच्या या सोळाव्या आवृत्तीला अभूतपूर्व यश मिळालं आहे. जागतिक बाजारपेठेशी समन्वय साधत या वर्षीच्या फिल्म बाजारनं देश तसंच राज्यस्तरीय उद्योजकांच्या सहभागानं आपली व्याप्ती वाढवली आहे, असं ते म्हणाले.

<><><><>

मराठी आणि हिंदी चित्रपट आणि नाट्यसृष्टीमधील दिग्गज अभिनेते विक्रम गोखले यांचं आज पुण्यामध्ये प्रदीर्घ आजाराने निधन झालं. ते ७७ वर्षांचे होते. गेले पंधरा दिवस त्यांच्यावर पुण्याच्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये उपचार सुरू होते. गेल्या चार-पाच दिवसांपासून त्यांची प्रकृती गंभीर होती आणि उपचारांना प्रतिसाद देत नव्हती. त्यांचा पार्थिव देह दुपारी चार वाजता बालगंधर्व रंग मंदिरामध्ये अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर संध्याकाळी सहा वाजता पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमी मध्ये त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येतील, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे.

<><><><>

भारत आणि न्यूझीलंडदरम्यान दुसरा एकदिवसीय क्रिकेट सामना उद्या हॅमिल्टन इथं खेळला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार सकाळी ७ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

<><><><>

कतर इथं सुरू असलेल्या फिफा विश्वचषक फूटबॉल स्पर्धेत आज ऑस्ट्रेलियाचा सामना ट्युनिशिया बरोबर, सौदी अरेबियाचा सामना पोलंड बरोबर आणि फ्रांसचा सामना डेनमार्क बरोबर होणार आहे. ड गटात फ्रांस बरोबर

निराशाजनक पराभवानंतर ऑस्ट्रेलिया जोमानं मैदानात उतरेल असं सांगितलं जातंय. फ्रांसनं ऑस्ट्रेलियाचा ४-१ असा पराभव केला होता. ट्युनिशिया आणि डेन्मार्कचा सामना अनिर्णित राहिला होता. क गटात लिओनल मेस्सीच्या अर्जेंटिनाचा २-१ असा पराभव केल्यानंतर सौदी अरेबिया पोलंड विरुद्धच्या सामन्यात नक्कीच जोमानं उतरेल. पोलंड आणि मेक्सिकोचा सामना देखिल अनिर्णित राहिला होता. नॉक आऊट मध्ये आपलं स्थान निश्चित करण्याची फ्रांसला मोठी संधी आहे. नॉक आऊट मध्ये आपलं स्थान निश्चित करणारा फ्रांस हा पहिला देश असेल. दुसरीकडे डेन्मार्क साठी करो या मरो अशी स्थिती आहे. त्यांना हा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागेल नाहीतर ते स्पर्धेतून बाहेर जातील.

//<><><><>//